RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक ९८] गुरुवार, जुलै २५, २०२४/श्रावण ३, शके १९४६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २७३**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ जुलै २०२४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ अधिनियम, २०२३.**

क्रमांक एडीआर २०२४/प्र.क्र. २९ (भाग-१)/तांशि-६.—महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ अधिनियम, २०२३ (२०२४ चा महा. १२) याच्या कलम द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, नियामक परिषदेची स्थापना करीत असून जी, पदविका स्तरीय कला शिक्षणाशी आणि उक्त अधिनियमान्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येणाऱ्या परीक्षांशी संबंधित असणाऱ्या बाबींचे नियंत्रण व संनियंत्रण करणारी सर्वोच्च संस्था असेल.

२. नियामक परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

| अ. क्र. (१) | पदाचे नाव (२) | (३) |
|---|---|---|
| (क) | मंत्री,<br>उच्च व तंत्र शिक्षण विभाग, | अध्यक्ष ; |
| (ख) | राज्यमंत्री,<br>उच्च व तंत्र शिक्षण विभाग, | उपाध्यक्ष ; |
| (ग) | सचिव,<br>उच्च व तंत्र शिक्षण विभाग किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले, | पदसिध्द सदस्य ; |
| (घ) | संचालक,<br>कला संचालनालय, | पदसिध्द सदस्य ; |

| अ. क्र. (१) | पदाचे नाव (२) | (३) |
|---|---|---|
| (ड) | संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, | पदसिध्द सचिव; |
| (च) | उप संचालक (प्रशासन), कला संचालनालय, | पदसिध्द सदस्य; |
| (छ) | सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, | पदसिध्द सदस्य; |
| (ज) | शासनाने नामनिर्देशित केलेले, कला क्षेत्रातील तीन ज्येष्ठ व्यावसायिक कलाकार,— | |
| | (एक) श्री. वासुदेव कामत, | सदस्य ; |
| | (दोन) श्रीमती स्नेहल पागे (महिला), | सदस्य ; |
| | (तीन) श्री. प्रमोद दत्तात्रय कांबळे (अनुसूचित जातीतील व्यक्ती), | सदस्य. |

**टीप .—** (१) नियामक परिषदेच्या नामनिर्देशित सदस्यांचा पदावधी, राज्य शासनाने, आधीच संपुष्टात आणला नसेल तर, पाच वर्षांच्या कालावधीकरिता असेल.

(२) नियामक परिषदेच्या, प्रत्येक वर्षामध्ये तीनपेक्षा कमी नसतील इतक्या बैठका होतील, आणि दोन सलग बैठकांमध्ये चार महिन्यांपेक्षा अधिक कालांतर असणार नाही.

(३) नामनिर्देशित सदस्यांना, बैठकांना उपस्थित राहण्यासाठी शासनाद्वारे निर्धारित करण्यात येतील असे भत्ते मिळतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
शासनाचे प्रधान सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg , Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 25th July 2024.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STATE BOARD OF ART EDUCATION ACT, 2023.

No. ADR 2024/C. R. 29 (Part-1)/TE-6.—ln exercise of the powers conferred by section 3 of the Maharashtra State Board of Art Education Act, 2023 (Mah.XII of 2024), the Government of Maharashtra hereby establishes the Governing Council, which shall be an apex body to control and monitor the matters pertaining to diploma level art education and examinations to be conducted by the Maharashtra State Board of Art Education established under the said Act.

2. The Governing Council shall consisting of the following members, namely :—

| Sr. No. | Name of the Post | |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| (*a*) | Minister,<br>Higher and Technical Education Department, | President; |
| (*b*) | Minister of State,<br>Higher and Technical Education Department, | Vice-President ; |
| (*c*) | Secretary,<br>Higher and Technical Education Department or his nominee, | ex-officio Member ; |
| (*d*) | Director,<br>Directorate of Art, | ex-officio Member ; |
| (*e*) | Director,<br>Maharashtra State Board of Art Education, | Member Secretary ; |
| (*f*) | Depurty Director (Administration),<br>Directorate of Art, | ex-officio Member ; |
| (*g*) | Secretary,<br>Maharashtra State Board of Art Education, | ex-officio Member ; |
| (*h*) | three senior practicing artists in the field of Art, nominated by the Government,—<br>(*i*) Shri Vasudev Kamath,<br>(*ii*) Smt. Snehal Page (Woman),<br>(*iii*) Shri Pramod Dattatray Kamble (person belonging to Scheduled Castes), | <br><br>Member;<br>Member;<br>Member. |

*Note* .— (1) The term of the nominated members of the Governing Council shall be for a period of five years, unless terminated earlier by the State Government.

(2) The Governing Council shall meet not less than thrice in every year, and a period of not more than four months shall intervene between two successive meetings.

(3) The nomintated members shall receive such allowances, as may be determined by the Government, for attending the meetings.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIKAS CHANDRA RASTOGI,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.